Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# पायाभुत सरंचना आणि भारतीय शेती

**प्रा. डॉ. एस.एस. गिरे**
विभाग प्रमुख,
विषय अर्थशास्त्र डॉ. बाबासाहेब अंबेडकर
मराठवाडा विदयापीठ छत्रपती संभाजीनगर
संलग्न आर वाय पी कला महाविदयालय विहामांडवा
ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर.

**प्रस्तावना**

आर्थिक विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. आर्थिक विकास सतत चालणारी प्रक्रिया असली तरी तिचा खरा संबंध पायाभुत सरंचना या संकल्पनेशी असतो. पायाभुत सरंचना किंवा सुविधा उत्तम असतील तर देशातील शेती, उदयोग आणि सेवा क्षेत्र विकसित होईल आणि पर्यायाने देशाचा संपुर्ण विकास झालेला असेल पायाभुत सरंचना म्हणजे , अर्थव्यवस्थेच्या कार्यवाहीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा होत. यामध्ये विमा,बॅंका,ऊर्जा विपणन, वाहतुक आणि दळणवळण यांचा तसेच आरोग्य आणि शिक्षण या सर्व घटकांचा संबंध असतो. उत्तम पायाभुत सरंचनेमुळे उत्पादकता वाढत जाते आणि रोजगार संधी वाढत असते.

भारत देशाला विकसित राष्ट्र म्हणुन जगामध्ये नावलौकिक होण्यासाठी भांडवल सामग्री महत्वाची असते बाजारपेठेचा विकास होणे गरजेचे आहे. लोकांनी गुणवता सुधारणे सुधारण्यासाठी हे पायाभूत सरंचना अत्यावश्यक ठरतात. देशातील पायाभुत सुधारणा झाल्यास भारताची विकास प्रक्रिया अधिक गतीमान होईल आणि उदयाचा उज्वल भारत घडेल. भारत हा कृषी प्रधान देश आहे आणि मानवाला जीवन जगण्यासाठी आवश्यक अशा वस्तु व सेवांचे उत्पादन त्यांचे वितरण आणि उपभोग या संबंधींची प्रत्येक देशातील व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय. अशा अर्थव्यवस्थेत वस्तु व सेवांचे उत्पादन अधिकाधिक वाढत जाणे व आर्थिक वाढीचा दर लोकसंख्येपेक्षा अधिक असेल तर त्याला अर्थिक विकास असे संबोधले जाते. मानवी जीवनाचे कल्याण साधणे हे पायाभुत आर्थिक सुविधाचे उद्दिष्ट असते. साधने सतत उत्पादनासाठी वापरलेल्याने त्यांची हानी होते व ती हानी भरून काढल्याशिवाय उत्पादनात सातत्य राखता येत नाही, “देशाचा अर्थिक विकास कितपत · झाला हे मोजण्यासाठी अनेक मापदंड वापरले जातात जसे ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न (G.N.P.), निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (N.N.P), ढोबळ देशांतर्गत उत्पन्न (G.D.P.) तसेच निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (N.N.P.) इत्यादी " प्रस्तूत शोधनिबंधात पायाभूत संरचनेचा भारतीय शेतीवर होणाऱ्या परीणामाचा
आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. पायाभूत सुविधेवर कृषीचा विकास, कृषी वस्तूचा विदेशी व्यापार, उत्पादने व निविष्टी यांच्या किंमती, कृषीक्षेत्रातील भांडवल गुंतवणूक, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि अन्न सुरक्षा इत्यादीवर भारतीय पायाभूत संरचनेचा आढावा घेण्यात आलेला आहे.

⁎ **शोधनिबंधाचे उद्देश**

1. पायाभूत संरचनेचा अभ्यास करणे.

2. पायाभूत संरचनेचा भारतीय शेतीवर झालेल्या अनुकूल परीणामाचा अभ्यास करणे.

3. पायाभूत संरचनेत शेती उत्पादकांच्या समस्याचा आढावा घेणे.

4. शेती विकासासाठी पायाभूत संरचनेतील सुधारणा व शेती उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना सूचविणे. असलेल्या 38,484 गावांना आणि 500 हुन अधिक लोकसंख्येच्या वस्त्यांना जोडण्याचे सरकारने ठरविले आहे. सन 2009 अखेर 1,46,484 कि.मी. लांबीचे रस्ते तयार करणे अपेक्षित होते. कृषी क्षेत्राच्या विपणनाच्या दृष्टीने 1,94,132.कि.मी. सुधारणा करण्याचे लक्ष्य आहे. यासाठी सरकारणे 48,000 कोटी रुपयाची गुंतवणूक तरतूद करण्यात आली होती. प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत नोव्हेंबर 2010 पर्यंत राज्यांच्या कामावर 74,34,818 कोटी रुपये खर्च करण्यात आला. जानेवारी 2012 पर्यंत 4.41 लाख कि.मी. लांबीचे रस्ते तयार करण्यात आले. एकूण 82,019 वस्त्यांना नव्याने रस्त्यांनी जोडण्यात आले.

2) दळणवळण पोस्ट, तार, टेलिफोन, टेलिकम्यूनिकेशन इत्यादीचा यामध्ये समावेश होतो. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात संपूर्ण देशात पोस्टाचे जाळे पसरले. आज ग्रामीण भागात टपाल कचेऱ्या 'बचत बँका' म्हणून कार्य करतात. टेलिफोनद्वारे ही संदेश माहिती मिळते.

3) दूरसंचार : यामध्ये तार तारयंत्र टेलिफोन, रेडिओ, टि. व्ही. इत्यादीच्या साहयाने होणाऱ्या दळणवळणाचा समावेश होतो. मार्च 1948 मध्ये भारतात 321 टेलिफोन एक्स्चेंज होते. मार्च 2007 मध्येही संख्या 38,338 इतकी वाढली. डिसेंबर 2011 मध्ये भारतात टेलिफोनची संख्या 429.73 दशलक्षावरुन 926.55 दशलक्ष इतकी वाढली आहे. अशा पध्दतीने शेतीच्या संबंधीत आधुनिक माहिती मिळण्यास मदत झाली.

4) वीज पुरवठा (Electricity Supply) भारतात एप्रिल 2005 मध्ये "राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना" सुरु करण्यात आली. सन 2009 पर्यन्त सर्व ग्रामीण भागात वस्त्यापर्यंत वीज पुरवठा करणे उद्दिष्टे होते. ग्रामीण भागात वीजपुरवठा झाल्यास शेती, विद्युत पंपसेटस्, लघु उद्योग, मध्यम उद्योग, खादी व ग्रामोद्योग, आरोग्य, शिक्षण, माहिती तंत्रज्ञान या सर्व क्षेत्राच्या विकासाला गती मिळेल अशी आशा आहे. सर्वकष ग्रामीण विकास, रोजगार निर्मिती आणि दारिद्र्य निर्मूलन इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होणार आहे. तसेच सन 2009 पर्यंत ग्रामीण विद्युतीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे शेती विकासाला चालना मिळाली. तसेच ऊर्जा, सामाजिक आधारभूत संरचना (Social Infrastructure) यामध्ये आरोग्य, शिक्षण अशा सुधारणा झाल्यामुळे या सर्व आधारभूत संरचनेच्या विकास प्रक्रियेचा शेती क्षेत्रावर अनुकूल परिणाम पुढील प्रमाणे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान किंवा अनुकूल परिणाम. भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. राष्ट्रीय उत्पन्नात अद्यापही बराच मोठा भाग शेतीक्षेत्रातून प्राप्त होतो. 'विकसनशील अर्थव्यवस्थांचे कृषिप्रधानता हे एक वैशिष्ट्य असते व कृषिप्रधान अर्थव्यवस्थेतीलच शेतीक्षेत्र हे मागासलेले असते' , असे प्रसिध्द अर्थतज्ज्ञ जे.के.गालब्रेथ हयांनी म्हटले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीक्षेत्रही मागासलेले आहे. आर्थिक धारणक्षेत्र नसणे, पुरेशा आदानांअभावी जमीनीची उत्पादकता कमी असणे, पाणीपुरवठ्याच्या सोयी नसणे, जमीनीचा कस मुळातच कमी असणे, शेती उत्पादनाचे तांत्रिक, शास्त्रीय ज्ञान नसणे, हयांसारख्या अनेक समस्या शेती व्यवसायाला भेडसावीत आहेत. त्यामुळे शेती व्यवसाय मागासलेला राहिला आहे. हया परिस्थितीतही भारतीय शेतीक्षेत्र अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान करीत

आहे. भारताच्या आर्थिक विकासात शेतीक्षेत्राला त्यामुळे अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. आर्थिक विकासात शेतीक्षेत्राचे स्थान स्पष्ट करण्यासाठी काही मुद्यांचा आधार घेतला जातो. त्यांच्या साहयाने भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्राने केलेले योगदानकिंवा **भारताच्या आर्थिक विकासात शेतीक्षेत्राचे स्थान** आपल्याला पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

1. शेतीक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा देशात एका विशिष्ट काळात निर्माण केलेल्या वस्तू व सेवांची पैशात व्यक्त केलेली किंमत किंवा मूल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात एका विशिष्ट क्षेत्राचा वाटा आहे, यावरुन त्या क्षेत्राचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील स्थान जाणता येते. भारतात शेतीक्षेत्राने राष्ट्रीय उत्पन्नात आपले मोठे योगदान केलेले आहे. 1950-51 मध्ये एकुण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा 57% इतका जास्त होता. 1997-98 मध्ये हेच प्रमाण 27% इतके होते. जरी हे प्रमाण 1950-51 च्या तुलनेने कमी झालेले असले, तरी शेतीचे अर्थव्यवस्थेतील योगदान कमी मानता येणार नाही. जर आपण इतर देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचे योगदान विचारात घेतले, तर आपल्या देशातील शेतीक्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान किंवा वाटा अद्यापही बराच मोठा असल्याचे आढळून येईल. उदाहरणार्थ, युनायटेड किंगडममध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्न शेतीचा वाटा केवळ 2% इतका आहे. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकामध्ये हेच प्रमाण 3% इतके आहे. ऑस्ट्रेलियात शेतीक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा 5% आहे. तर कॅनडामध्ये राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा 4% इतका आहे. यावरून आपणास काय आढळून येते? भारतात अद्यापही एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा मोठा आहे. इतर देशांत हे प्रमाण अत्यंत कमी आहे. भारतात अद्यापही एकुण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा मोठा असण्याची कारणे म्हणजे लोकसंख्येचे प्रचंड प्रमाण, लोकसंख्या ग्रामीण भागात केंद्रित असणे, ग्रामीण भागात रोजगाराच्या अन्य संधी उपलब्ध नसणे, लघू व कुटिरोद्योग यांचा पुरेसा विकास न होणे ही होय. देश जेवढा प्रगत तेवढा त्या देशातील राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा कमी, तर उद्योग व सेवाक्षेत्रांचा जास्त. या उलट जेवढा अविकसित देश तेवढा त्या देशतील उद्योग व सेवाक्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी शेतीक्षेत्राचा वाटा जास्त असतो.

2. रोजगारीच्या प्रमाणात वाढ. शेती, उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्राचा विचार केला असता अर्थव्यवस्थेतील एखादया विशिष्ट क्षेत्राने एकूण किती टक्के रोजगार लोकांना पुरविला आहे, यावरुन त्या क्षेत्राचे महत्त्व ठरत असते. भारतात 65% लोक शेतीक्षेत्रात काम करतात. त्यांना आपल्या रोजगारीचे साधन शेतीक्षेत्रच पुरविते. जरी एवढी प्रचंड संख्या शेतीवर काम करीत असली, तरी त्यांना पुरेसे काम, वेतन व जीवनमान शेतीक्षेत्र पुरवू शकत नाही. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामीण भागात इतर दुसरे रोजगाराचे कोणतेही साधन नसल्याने लोक शेतीवरच काम करतात. वरवर पाहता सर्व लोक काम करताना दिसतात, परंतु एकूण उत्पादनात पडणारी भर मात्र नगण्य असते. म्हणजेच काही लोकांची सीमांत

उत्पादकता शून्य असते. अशा वेळी जर काही लोक शेतीवरुन काढून घेतले व त्यांना अन्यत्र रोजगार पुरवला तर शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होऊन शेतीचा विकास होईल. परंतु अन्यत्र रोजगार उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील लोकांना शेतीवरच आपली गुजराण करावी लागते. याव्यतिरिक्त स्वयं-रोजगारासारख्या संधीचा अभाव, व्यवसायिक व तांत्रिक शिक्षणाचा अभाव, पुरेशा आर्थिक साहयाचा व प्रेरणेचा अभाव, पारंपरिक विचार, समजुती, एकत्र कुटूंब पध्दती, इत्यादी कारणांमुळे ग्रामीण भागातील

वाढती लोकसंख्या शेतीवरच गुजराण करते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीक्षेत्राला किती महत्त्वाचे स्थान आहे, हे शेतीक्षेत्र ज्या मोठ्या लोकसंख्येला रोजगार पुरविते त्यावरुन स्पष्ट होईल. 1991 मध्ये 65% लोक प्राथमिक क्षेत्रात कार्यरत होते. याचे उत्तर म्हणजे सरकारने विविध पंचावार्षिक योजनेत केलेल्या पायाभूत संरचनेचा विकास होय.

3. औद्योगिक विकासास सहाय्य. अर्थशास्त्रज्ञ प्रा.कुझनेट यांनी शेतीक्षेत्राचे महत्त्व स्पष्ट करताना शेतीक्षेत्र औद्योगिकउत्पादनासाठी किंवा उद्योगधंद्यासाठी जी आदाने किंवा कच्चा माल उपलब्ध करुन देते त्याचा, तसेच शेती उत्पादन वाढल्याने एकूण राष्ट्रीय उत्पन्नात झालेल्या वाढीचाहीउल्लेख 'प्रत्यक्ष मदत' म्हणून केला. उद्योगांना लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणावर शेतीक्षेत्रातून प्राप्त होतो. कापूस, ऊस, तेलबिया, इत्यादी शेतीक्षेत्रातील आदानांवर अनेक मोठे महत्त्वाचे उद्योग अवलंबून आहेत. त्याशिवाय हातमाग व्यवसाय, उद्योग, तांदूळ पॉलिश करण्याचा उद्योग ह्यांसारखे अनेक लहान उद्योग अवलंबून आहेत. उद्योगविकासात शेतीचा मोठा वाटा आहे. प्रा.कुझनेट ह्यांनी ह्या प्रत्यक्ष **मदतीव्यतिरिक्त** शेतीक्षेत्र अप्रत्यक्षरित्यादेखील साह्य करीत असते, हे स्पष्ट केले. जसे: शेती उत्पादन वाढल्याने अन्नधान्याच्या तसेच औद्योगिक मालाच्या किमती कमी राहतांत. त्यामुळे उद्योग व इतर क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांना वेतनवाढ द्यावी लागत नाही. शेती व्यवसायाची प्रगती झाल्यास शेतीतून श्रम व भांडवल काढून घेऊन ते उद्योगांना पुरवता येतात. शेती उत्पादन वाढल्याने शेतकऱ्यांची खरेदीशक्ती वाढते व ते इतर औद्योगिक उत्पादनांची मागणी करु शकतात त्यामुळे उद्योगांचा विकास होतो. शेतकरी आपली बचत बँका, आयुर्विमा, यांसारख्या संस्थांत ठेवतात. त्या बचतीचा वापर औद्योगिक विकासासाठी करता येतो. शेती उत्पादन वाढल्याने कच्चा माल स्वस्त दरात प्राप्त होऊन उत्पादनखर्चही कमी झाला. इत्यादी फायदे शेतीक्षेत्राच्या विकासाने होऊ शकतात हे स्पष्ट झाले आहे. अलीकडच्या काळात अनेक मोठे, अवजड उद्योग स्थापन करण्यात आलेले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आधुनिक उत्पादन करण्यात येते. त्यामुळे शेतीवर असे उद्योग फारसे अवलंबून नाहीत. परंतु शेतीक्षेत्र औद्योगिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर साहाय्यभूत ठरते ह्यात शंका नाही. परंतू पुरक वित्तपुरवठा झाला तर औद्योगिक विकासाबरोबरच शेती उत्पादकत्ता वाढण्यास मदत होईल.

4. निर्यातीच्या साह्याने बहुमोल परकीय चलनाची प्राप्ती. भारत देशाला आवश्यक असणारे तंत्रज्ञान, वस्तू व सेवा परकीय देशांकडून प्राप्त करुन घेण्यासाठी देशाची निर्यात वाढणे आवश्यक आहे. निर्यातीच्या साह्याने आपल्याला बहुमोल परकीय चलनाची प्राप्ती होते. जर आपण निर्यातीचा विचार केला, तर असे आढळून येते की, विकसित देशांत उत्पादनतंत्र मोठ्या प्रमाणावर सुधारलेले व आधुनिक स्वरुपाचे आहे. अशा वेळी आपण तयार केलेल्या औद्योगिक वस्तूंना पुरेशी मागणी येणे अशक्य असते. परंतु आर्थिक विकास प्रक्रियेत तर परकीय चलन मिळवणे आवश्यकच असते. अशा वेळी शेतीक्षेत्र मोठ्या प्रमाणावर साह्य करते. अन्नधान्य, चहा, साखर,तंबाखू, तेलबिया, मसाल्याचे पदार्थ, इत्यादीच्या निर्यातीद्वारे बहुमोल रकीय चलन प्राप्त होते. 1997-98 मध्ये भारताने 23,691 कोटी रुपयांची शेती व इतर संबंधित क्षेत्रातून विविध देशांत निर्यात केली. त्यात प्रामुख्याने ज्यूट, चहा, तंबाखू, काजू,धान्य, फळे इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश होता. यामुळे भारताला निर्यातीच्या साह्याने बहुमोल परकीय चलनाची प्राप्ती होते.

5. शेती उत्पादनातील प्रवृत्ती (Trends in Agriculturel Production) भारतीय अर्थव्यवस्थेमधील शेतीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतीच्या उत्पादकतेकड लक्ष देणे खूप महत्त्वाचे आहे. पायाभूत

संरचना याचा विचार करीता शेती आधुनिकीरण करुन शेती उत्पादनाची प्रवृत्ती लक्षात घेऊया.भारतीय शेती उत्पादनातील प्रवृत्ती

1950-51 ते 2009-10 या काळात अन्नधान्याचे उत्पादन 4.3 पटीने वाढले आहे. तेलबीयाचे उत्पादन 8 पटीने वाढले आहे. तसेच गव्हाच्या उत्पादनातही 13.1 पटीत वाढ आहे. यास कारण आधुनिक पायाभूत संरचना होत. कारण ही वाढ होण्यास सुधारीत खते, दर्जेदार बियाणे, जलसिंचन सुविधा कारण आहे. तरीही 1964-65 नंतरच्या काळात अन्नधान्याचे उत्पादन प्रतिवर्षी सरासरीने केवळ 2.4% वाढले आहे. याचे कारण शेती ही मान्सूनच्या पावसावर अवलंबून असल्याचे दिसून येते. शेती उत्पादनाचा घसरलेला वार्षिक दर वाढविण्यासाठी पाणी पुरवठ्याच्या सोई निर्माण होणे गरजेचे आहे. भारतीय शेतीच्या समस्या आदानाचे प्रदानात रुपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजे उत्पादन होय, परंतु विनिमय मूल्य असणाऱ्या उपयोगितांची निर्मिती म्हणजे उत्पादन ही व्याख्या अधिक योग्य ठरते. घटकाची उत्पादकता ठरते. भारतीय शेतीची उत्पादकता अत्यंत कमी आहे. उत्पादकताकमी असण्यामागे अनेक कारणे आहेत. भारताची लोकसंख्या खूप जास्त आहे. शेतीवर काम करणारी लोकांची संख्या वाजवीपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. तसेच रोजगारासाठी अन्य साधने उपलब्ध नसल्यामुळे भारतीय लोकांना शेतीवरच आपली गुजराण करावी लागते. तसेच भारतीय शेतकरी हा अज्ञान व दरिद्र्य असल्यामुळे उत्पादकता वाढीसाठी तो विशेष प्रयत्न करीत नाही. महत्त्वाचे म्हणजे वित्तपुरवठ्याच्या सोयी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना सावकाराकडून जादा दराने कर्ज घ्यावे लागते. सावकार शेतकऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्याची फसवणूक करतो. भारतात दारिद्र्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे लोकांना आधुनिक तंत्रज्ञान वापरता येत नाही. जूनाट तंत्राचाउपयोग, वाहतुकीच्या अडचणी, बाजारपेठेच्या अपूरी सोयी, शेती संशोधनाचा अभाव, अपूरा पाणी पुरवठा, आणि दारिद्र्याचे प्रमाण या सर्व कारणामुळे शेतीची उत्पादकताकमी असल्याच्या समस्या दिसून येतात. भारतीय **शेतीच्या समस्या दूर** करण्यासाठीच्या उपाययोजना शेतीचे उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी दोन घटक महत्त्वाचे आहेत ते म्हणजे. "तांत्रिक घटक" व संस्थात्मक घटक होय. अ) तांत्रिक घटक तांत्रिक घटकात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या आदानांचा व तंत्रज्ञानाच्या बाबींचा विचार होतो. जसे, खते, आधुनिक बी-बियाणे, उत्पादनासाठी आधुनिक अवजारे जसे ट्रक्टर, आधुनिक नांगर, पाणी पुरवठ्याच्या सोयी, इत्यादी बाबींचा विचार तांत्रिक घटकात करण्यात येत आहे.

ब) संस्थात्मक घटक

संस्थात्मक घटकात जमिनीच्या मालकीचा विचार करण्यात येतो, जमिनीतून अधिक उत्पादन होण्यासाठी जमिनीची मालकी शेतकऱ्यांकडे असणे आवश्यक आहे. याशिवाय या घटकात शेतजमीनीचा लहान आकार, शेतजमीनीचे विभाजन, कुळाचे हक्क, खंडाचा अवास्तक दर, इत्यादी गोष्टीचा व त्याचा शेती व्यवसायावर शेती उत्पादकतेवर होणारा एका विशिष्ट उत्पादन घटकाने एकूण उत्पादनात किती भर घातली यावरुन त्या उत्पादन परिणाम ह्यांचा विचार होतो. शेती विकासाच्या तांत्रिक व संस्थात्मक घटकात या दोन्ही घटकात कोणता घटक महत्वाचा आहे. यामध्ये मतभिन्नता आहे. काही शेतीतज्ञ अर्थतज्ञांच्या मते शेती उत्पादकतेच्या वाढीसाठी संस्थात्मक घटकांपेक्षा तांत्रिक घटक महत्वाचे आहेत. जमिनीचा पुरवठा मर्यादित असल्याचे व शेती व्यवसाय निसर्गावरच अवलंबून असल्याने केवळ तांत्रिक घटकांद्वारे जास्तीत जास्त उत्पादकता वाढविण्याचा प्रयत्न करावा त्यासाठी, खते, बी-बियाणे ह्यांच्या विविध जाती शोधून काढाव्यात. शेती व्यवसायात आधुनिक तंत्राचा वापर करावा, संशोधन करावे, शेतजमीनीची मालकी, शेतजमीनीचे न्याय व समान वाटप, शेतजमीनीची उत्पादकता वाढविण्यास

उपयुक्त ठरतात. जर शेत जमिनीची मालकी शेतकऱ्याकडे नसेल तर उत्पादन वाढविण्यासाठी पुरेसे प्रयत्न होणार नाही, त्याचा फायदा जमीनदारालाच होणार. या भावनेने उत्पादन वाढीचा प्रयत्न होणार नाही. मालकी शेतकऱ्याकडे असेल तर तो लाभासाठी उत्पादकता वाढविल, त्यामुळे भारतीय शेती विकासासाठी संस्थात्मक घटक अधिक महत्त्वपूर्ण आहे असेही म्हणता येईल. भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान असूनही अद्यापि शेती ही निर्वाह पातळीवरच आहे. भारतासारख्या विकसनशिल देशांच्या संदर्भात संस्थात्मक घटकांना फार महत्त्व आहे. अर्थात तांत्रिक घटक कमी महत्त्वाचे आहेत असे मात्र नाही. जर संस्थात्मक घटकांकड अधिक लक्ष दिले, तर तांत्रिक प्रगती किंवा तांत्रिक बाजू साध्य करणे सोपे होत असते. एकंदरीत शेती उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी विविध पंचवार्षिक योजनेत शेतीवर भर पिकविमा संरक्षण देणे, सहकारी शेतीला प्रोत्साहन देणे, मध्यस्थ किंवा दलालाचे उच्चाटन करणे, कुळ सुधारणा जसे खंडाचे नियमन करणे, जमीन धारणेवर मर्यादा घालणे, शेती व्यवसायाचे संघटन व सहकार शेती संघटन व कार्यवाही करणे, पाणीपुरवठा सोय करणे, शेती विषयक संशोधन, शेतमालाची विक्रीव्यवस्था, भांडवलाचा पुरवठा सोयी, सिंचन सुविधाचा विस्तार, शेतीभार कमी करणे, पीक संरक्षण आणि सुलभ वित्त पुरवठा झाला तर शेतीची उत्पादकता वाढवून अर्थिक विकासास चालना मिळेल.

**सारांश -**

भारताच्या आर्थिक विकासात शेतीक्षेत्राला महत्वाचे स्थान आहे. पायाभूत संरचना उत्तरोत्तर उत्तम केल्यास शेतीची उत्पादकता अधिक वाढू शकते. बहुसंख्य लोक शेतीवरच आपली गुजराण करतात. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात 34% वाटा शेतीक्षेत्राचा आहे. शेती व्यवसायात बहुसंख्य लोक काम करतात. शेती व्यवसाच्या विकासामुळे औद्योगिक विकासाला मदत झाली आहे. देशाला आवश्यक असणारे परकीय चलन प्राप्त करुन घेण्यासाठी आपण चहा, तंबाखू, ज्यूट अशा जवळ जवळ सहा हजार उत्पादनाची निर्यात करतो. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते आहे.

संदर्भसुची -

1. प्रा.सौ.पंडित शांता, डॉ.लीला पाटील, कृषी अर्थशास्त्राची मूलतत्वे, नागपूर,
महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती.
2. Ruddar Datta, K.P.M. Sundharam New Delhi,
3. डॉ. देशमुख प्रभाकर, भारतीय अर्थव्यवस्था, नागपूर, पिंपळपुरे अँड कं.
4. देसाई, दास्ताने, भालेराव, भारतातील ग्रामीण बँक व्यवसाय,
दुसरी आकृती, 1997, निराली प्रकाशन, पुणे,
5. आर्थिक विकास व नियोजन- डॉ. विश्वास कदम. कैलाश पब्लिकेशन औरंगपुरा, औरंगाबाद.
6. भारतीय अर्थव्यवस्था प्रा. रायखेलकर आणि डॉ. दामाजी.
7. Economic Survey (2018-19)
8.अॅग्रोवन-
9. भारत सरकार शेतकरी मंत्रालय वार्षिक अहवाल, 2021-22.